प्रतिवर्ती: उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीरामपुर
फॅक्स: 02422/224751

महत्वाचे Trailers used for Agriculture purpose

शेती कामासाठी वापरात असणा-या ट्रेलर्स बाबत.

NO·TC/Desk-3/245/2004/ON-12046, Dated-13/9/2004

## परिपत्रक

**परिवहन आयुक्त कार्यालय**
प्रशासकिय इमारत, ३रा ४था मजला
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.

क्रमांक : पआ/का-३/२४५/२००४/जा.क्र. 92068 दिनांक :- 13 SEP 2004

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम १९५८ च्या परिशिष्ट १ वर्ग ८ मध्ये सुधारणा करुन शेतीकामासाठी वापरात असलेल्या ट्रेलर वर कर आकारणी शासन अधिसुचना क्रमांक एमटीए १०२००/सीआर-१२/परिवहन-३ दिनांक ३१.३.२००१ अन्वये दिनांक १.४.२००१ पासून लागू करण्यात आली होती.

शासन अधिसुचना क्रमांक एमटीए १०२००/सीआर १२/परि-३, दिनांक ३१.७.२००४ या शासन अधिसुचने अन्वये शेतीकामासाठी वापरात असलेल्या ट्रेलरवर लागू करण्यात आलेली करआकारणी मागे घेण्यात आलेली आहे. त्यामुळे १/८/२००४ पासून शेतीकामासाठी वापरल्या जाणा-या ट्रेलर्सना कर कायदा कलम १३(२) नुंसार करमाफी देण्यात यावी.

ज्या ट्रेलर्सनी ( शेती कामाकरीता वापरल्या जाणाऱ्या ) एकरकमी कर भरलेला असेल अशा ट्रेलर्सच्या बाबतीत कर परतावा देताना दुस-या शेडयूलच्या भाग तीन (Second Schedule Part III) अन्वये दिनांक ३१.७.२००४ पर्यन्त वाहनाच्या वयोमाना अन्वये कर परतावा देय होईल.

ज्या ट्रेलर्सने ( शेती कामाकरीता वापरल्या जाणाऱ्या ) कर भरलेलाच नाही अशांच्या बाबतीत दुस-या शेडयूलच्या भाग दोन (Second Schedule Part II) प्रमाणे वाहनाचे वय निश्चित करुन त्याप्रमाणे कर आकारणी करावी. व पार्ट III प्रमाणे कर परतावा देण्याची कार्यवाही करावी.

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी.
सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

c:/nilam/letter/p.g.17

पआ/का-३/५१३/२००४/जा.क्र.
**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३रा/४था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,
शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व),
मुंबई-४०००५१.

क्रमांक :पआ/का-३/५१३/परिपत्रक/२००४/जा.क्र. 960663 **दिनांक**
- 6 DEC 2004

## परिपत्रक

**विषय :-** वाहनाच्या कर आकारणी बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महालेखाकाराच्या लेखा परीक्षणात तसेच व्याज माफी करिता जी प्रकरणे या कार्यालयात पाठविली जातात ती बहुतांशी चुकीची कर आकारणी व कमी कर घेतल्या बाबतची असतात.

महालेखाकाराच्या प्रत्येक वर्षी प्रकाशित होणा-या महसूली जमा अहवालात चुकीची कर आकारणी केल्या बाबत तसेच कमी कर वसूल केल्याबाबतचे आक्षेप असतात. विविध वाहनांवर आकारणी करावयाची कराची अद्ययावत माहिती प्रत्येक प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात उपलब्ध असताना देखिल संबंधित प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून काही प्रकरणात कराची चुकीची आकारणी करण्यात येते. तसेच प्रत्येक परिवहन कार्यालयात अंतर्गत लेखा परीक्षण विभाग असतांना देखिल सदर बाब तात्काळ त्यांच्या लक्षात येत नाही हे खेदजनक आहे.

सदर कमी आकारणी, चुकीची आकारणीची प्रकरणे प्रत्येक वर्षी महालेखाकाराच्या आक्षेपात दाखवली जातात या बाबींची नोंद मा. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय यांनी गांभीर्याने घेतली आहे.

याबाबत सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, यापुढे चुकीची कर आकारणी केल्याची प्रकरणे आढळून आल्यास संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्याबाबत वसुलीची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्यात येईल.

तसेच सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी कर विषयक सुचनांची / परिपत्रकांची स्थायी नस्ती प्रत्येक कार्यालयात ठेवावी. ती सातत्याने अद्ययावत

करावा. सदर अद्ययावत माहितीचा वापर कर आकारणी करणा-या अधिकारी / कर्मचा-यांनी करावा. कर आकारणी करणा-या अधिकारी / कर्मचा-यांना तसेच अंतर्गत लेखा परिक्षण करणा-या कर्मचा-यांना कर आकारणीचे प्रशिक्षण द्यावे व त्यांच्या ज्ञानात अद्ययावत माहितीची भर टाकावी. याबाबत प्रत्येक प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी प्रशिक्षणाचा कृति आराखडा तयार करुन त्यानुसार प्रशिक्षण द्यावे. सदर कृति आराखडा माहितीसाठी या कार्यालयाकडे पाठवावा.

**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रति,**
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

परिवहन आयुक्त यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत, ३रा व ४था मजला
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, सरकारी वसाहत,
बांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
पआ/का.३/जा.क्र. १७८१८ दिनांक : - 8 DEC 2004

# परिपत्रक

विषय : वाहनांच्या थकीत करावावत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, मालावरील करावावतचा मुंबई मोटार वाहन (मालावरील ) कर कायदा १९५८, दिनांक ३१/३/१९८० ला रद्द करण्यांत आलेला आहे. सदरहु कायदा रद्द होऊन २३ वर्षे झालेली असून सुध्दा (मालावरील) कर थकीत आहे.

तसेच कंत्राटी प्रवासी बस वरील प्रवाशी करावावतची तरतुद १/४/१९८९ पासुन रद्द करण्यांत आलेली आहे सदरहु तरतुद रद्द होऊनही अजूनही प्रवासी कर थकीत असल्याचे दिसून येते.

दुचाकी वाहनावर एक रकमी कराची पध्दत १९८७ पासून व चार चाकी वाहनांना १९९६ पासून एक रकमी कर पध्दत लागु करण्यांत आलेली असताना सुध्दा कर थकित असल्याचे निदर्शनास येते.

थकीत कराची रक्कम वसूल करण्यासाठी विशेष मोहिम राबविणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणामध्ये वाहन मालक व वाहन उपलब्ध नाही अशा प्रकरणात निर्लेखनाची कार्यवाही शासन अधिसूचना क्रमांक एमव्हीटी-२५७१/ ४७-२(२८)/टिआरए -३, दिनांक ८/१०/१९८२ अन्वये कर निर्लेखित करण्याकरिता पारित केलेल्या कार्यपध्दतीनुसार करावी.

त्याचप्रमाणे वाहनमालक/वाहन आवळून येत असल्यास कर वसूल करण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसुल कायद्याअंतर्गत अधिकार या विभागातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यांत आलेले आहेत.थकित कराची वसुली, कर निर्लेखित करणे व वसूली करणे इत्यादी बावत कालबध्द कार्यक्रम तयार करुन सर्व अधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे थकित कर वसूलीची तिमाही माहिती सोबतच्या प्रपत्रामध्ये सादर करावी. थकीत कर वसुलीचे त्रैमासिक अहवाल प्रादेशिक परिवहन कार्यालयात एकत्रित करुन जिल्हा निहाय/कार्यालय निहाय त्रैमासिक पुढील महिन्याच्या २० तारखेपूर्वी कार्यासन -१४ ला सादर करावा.

परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व उप/प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना पुढील कार्यवाही करिता.

Regarding Tax Assessment of Motor Vehicle

NO. TC/Desk-3/513/Circular/2004/ON-17773, dated. 6/12/04

क्र. पआ/का.३/नावापर/५१३/२००४/जाक्र
**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत,३ व ४था मजला,
शासकीय वसाहत,वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५१

क्रमांक :पआ/का.३/५१३/परिपत्रक /२००४/जाक्र.१७७७३ दिनांक ६ डिसेंबर २००४

**परिपत्रक**

विषय -वाहनाच्या कर आकारणीबाबत

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महालेखाकाराच्या लेखा परिक्षणात तसेच व्याज माफी करिता जी प्रकरणे या कार्यालयात पाठविली जातात ती बहुतांशी चुकीची कर आकारणी व कमी कर घेतल्या बाबतची असतात.

महालेखाकारांच्या प्रत्येक वर्षी प्रकाशित होणा-या महसूली जमा अहवालात चुकीची कर आकारणी केल्या बाबत तसेच कमी कर वसूल केल्याबाबतचे आक्षेप असतात. .विविध वाहनांवर आकारणी करावयाची कराची अद्यावत माहिती प्रत्येक प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात उपलब्ध असताना देखिल संबंधित प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून काही प्रकरणात कराची चुकीची आकारणी करण्यांत येते. तसेच प्रत्येक परिवहन कार्यालयात अंतर्गत लेखा परिक्षण विभाग असतांना देखिल सदर बाब तात्काळ त्याच्या लक्षांत येत नाही हे खेदजनक आहे.

सदर कमी आकारणी /चुकीची आकारणीची प्रकरणे प्रत्येक वर्षी महालेखापालांच्या आक्षेपात दाखवली जातात या बाबीची नोंद मा. प्रधान सचिव (परिवहन) , गृह विभाग, मंत्रालय यांनी गंभीरपणे घेतली आहे.

याबाबत सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्राददेशिक परिवहन अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येत आहेत की, यापुढे चुकीचा कर आकारणी केल्याची प्रकरणे आढळून आल्यास संबंधित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यांत येईल. तसेच त्याबाबत वसुलीची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्यांत येईल.

तसेच सर्व प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी कर विषयक सूचनाची / परिपत्रकाची स्थायी नस्ती प्रत्येक कार्यालयात ठेवावी, ती सातत्याने अद्यावत करावी

सदर अद्यावत माहितीचा वापर कर आकरणी करणा-या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी करावा. कर आकारणी करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना तसेच अंतर्गत लेखा परिक्षण करणा-या कर्मचा-यांना कर आकारणीचे प्रशिक्षण द्यावे व त्यांच्या ज्ञानात अद्यावत माहितीची भर टाकावी याबाबत प्रत्येक प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी प्रशिक्षणाचा कृति आराखडा तयार करुन त्यानुसार प्रशिक्षण द्यावे. सदर कृति आराखडा माहितीसाठी या कार्यालयाकडे पाठवावा.

सही/-
**परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रति,
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी,/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,

No. TC/DESK-S/CN-17919, dated 8/12/04 2004

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत,३ व ४था मजला,
शासकीय वसाहत,वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०००५१

क्रमांक :पआ/का.३/जाक्र.१७९१९ दिनांक ८ डिसेंबर २००४

**परिपत्रक**

विषय -वाहनाच्या थकीत कराबाबत

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, मालावरील कराबाबतचा मुंबई मोटार वाहन (मालावरील) कर कायदा १९५८, दिनांक ३१/३/१९८० ला रद्द करण्यांत आलेला आहे. सदरहू कायदा रद्द होऊन २३ वर्षे झालेली असुन सुध्दा (मालावरील) कर थकीत आहे .

तसेच कंत्राटी प्रवासी बसवरील प्रवाशी कराबाबतची तरतूद १/४/१९८९ पासून रद्द करण्यांत आलेली आहे . सदरहू तरतूद रद्द होऊनही अजुनही प्रवासी कर थकीत असल्याचे दिसून येते.

दुचाकी वाहनांवर एक रक्कमी कराची पध्दत १९८७ पासून व चार चाकी वाहनांना १९९६ पासून एक रक्कमी कर पध्दत लागू करण्यांत आलेली असताना सुध्दा कर थकीत असल्याचे निदर्शनास येते

थकीत कराची रक्कम वसूल करण्यासाठी विशेष मोहिम राबविणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणामध्ये वाहन मालक व वाहन उपलब्ध नाही अशा प्रकरणात निर्लेखनाची कार्यवाही शासन अधिसूचना क्रमांक एमटिए २५७९/४७-२ (२८)टिआरए -३ दिनांक ८/१०/१९८२ अन्वये कर निर्लेखित करण्याकरिता पारित केलेल्या पध्दतीनुसार करावी.

त्याचप्रमाणे वाहन मालक /वाहन आढळून येत असल्यास कर वसूल करण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल कायदयाअंतर्गत अधिकार या विभागातील अधिका-यांना प्रदान करण्यांत आलेले आहेत. थकीत कराची वसूली कर निर्लेखित करणे व वसूली करणे इत्यादी बाबत कालबध्द कार्यक्रम तयार करुन सर्व अधिका-यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे थकीत कर वसूलीची तिमाही सोबतच्या प्रपत्रामध्ये सादर करावी. थकीत कर वसुलीची त्रैमासिक अहवाल प्रादेशिक परिवहन कार्यालयात एकत्रित करुन जिल्हा निहाय/ कार्यालय निहाय तपशिल पुढील महिन्याच्या २० तारखेपूर्वी कार्यासन १४ ला सादर करावा.

सही/-
**परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**